वाचले - १) क्र.माध्य/शि/०२/४६८/२०२१ दि.१६/११/२०२१
२) दि.२४/११/२०२१ चा खुलासा
३) क्र.माध्य/शि/०१/कावि/१६६/२०२२ दि.०५/०४/२०२२
५) दि.१२/०४/२०२२ चा खुलासा
६) माध्यमिक शिक्षण विभागाचा दि. २५/०५/२०२२ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/ २५६ /२०२२
दिनांक- २५/५/२०२२

विषय – श्री.शेळकंदे यमा दगडू "सहाय्यक शिक्षक"
सक्त ताकीद देणेबाबत.......( मा.वि.नेहरूनगर )

आदेश

ऊपरोक्त वाचले क्र.०१ अन्वये तुम्ही दि.३०/०७/२०२१ ते २२/०८/२०२१ अखेर एकुन – २४ दिवस विनापरवाना वैद्यकीय कारणास्तव गैरहजर राहिलेले होते. तुम्ही विद्यालयात रूजु झाल्यानंतर वैद्यकीय प्रमाणपत्र सादर कलेले होते.सदर वैद्यकीय प्रमाणपत्रावर मनपाच्या रूग्णालयातुन प्रमाणीत करणे कामी तुम्हास सुचना दिलेल्या होत्या.त्याबाबत तुम्ही स्पष्ट नकार दिलेला आहे.सदर बाब कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने योग्य नाही.तसेच तुमचा वाचले क्र. ०२ मधील खुलासा कामकाजाच्या दृष्टीने सयुक्तीक वाटत नाही. तम्ही विद्यालयाचे शिक्षक या न्यात्याने विद्यालयातील सर्व बाबी ज्ञात असणे आवश्यक आहे.

तसेच तुम्हास वाचले क्र.०३ अन्वये नोटीस देणेत आलेली होती.त्याबाबत तुम्ही वाचले क्र.०४ अन्वये खुलासा सादर केलेला आहे.३०/०७/२०२१ ते २२/०८/२०२१ अखेर आजारी असताना मी विद्यार्थ्यांना ऑनलाईन आभ्यासक्रम देत होतो,असे नमुद करणेत आलेले आहे.सदर बाब तुम्हास कितपत योग्य वाटते याचे तुम्ही स्वत: अवलोकन करावे, सदर बाब कार्यालीन कामकाजाचे दृष्टीने अतिशय गंभीर आहे. तुम्ही मुख्याध्यापक पद घेण्यासही यापुर्वी नकार दिलेला आहे. यावरून असे दिसुन येते कि तुम्ही शैक्षणिक कामकाजात पुर्णपणे टाळाटाळ करत आहात.असे दिसुन येत आहे.

सबब तुम्हास या आदेशान्वये सक्त समज देणेत येते की,तुम्ही यापुढे विद्यालयात विनापरवाना गैरहजर राहिल्यास अथवा कोणत्याही कामकाजात हलगर्जीपणा केल्याचे निदर्शनास आलेस तुमच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६ (ड ) अन्वये दंडात्मक कारवाई करणेत येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

प्रत,
मा.अतिरिक्त आयुक्त (१)
मा.माहीतीसाठी सविनय सादर